मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# नव्या संकेतस्थळासाठी हॅकेथॉन स्पर्धा

## माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या वतीने ऑनलाइन पद्धतीने हॅकेथॉन स्पर्धेचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळासाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या वतीने ऑनलाइन पद्धतीने हॅकेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ८ व ९ एप्रिल रोजी या स्पर्धा होणार आहेत. यामध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. राज्य शासनाच्या १०० दिवसीय उपक्रमाअंतर्गत या स्पर्धेचा उपक्रम होणार आहे.




पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळाचे दर पाच वर्षांनी नूतनीकरण करण्यात येते. यापूर्वी २०१७मध्ये संकेतस्थळाचे नूतनीकरण झाले होते. आता नव्याने बदल करून तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता या सगळ्यांचा अंतर्भाव करून संकेतस्थळाची रचना केली आहे. १५ एप्रिल रोजी या संकेतस्थळाचे अनावरण करण्याचे नियोजन आहे. या संकेतस्थळामध्ये बदल अथवा त्रुटी असतील त्या शोधून काढण्यासाठी हॅकेथॉन स्पर्धेचे आयोजन केले आहे. त्यामध्ये हवे असलेले तांत्रिक बदल, त्यांची मते अभिप्राय नागरिकांना मांडता येणार आहे. महत्त्वपूर्ण त्रुटी, नवीन संकल्पना किंवा सायबर सुरक्षा आदींबाबत अभिप्राय सुचविणाऱ्या स्पर्धकास बक्षीसदेखील देण्यात येणार आहे.

> पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नव्याने विकसित केलेल्या संकेतस्थळाचा नागरिकांना अधिक चांगला उपयोग करता यावा. तसेच त्यामध्ये आवश्यक सुधारणा करता याव्यात, यासाठी हॅकेथॅान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमातून नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढेल आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने अधिक सुलभ व सुरक्षित प्रशासकीय सेवा प्रदान करण्यास मदत होईल.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

### असा घेऊ शकता सहभाग

८ एप्रिल रोजी सायंकाळी ५ ते ९ एप्रिल दुपारी १२ वाजेपर्यंत नागरिक ऑनलाइन पद्धतीने सहभाग घेऊ शकतात

४ मार्चपासून नागरिकांना HTTPS://FXURL.CO/O5GR4 या लिंकद्वारे नोंदणीची सुविधा

स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या नागरिकांना सहभाग प्रमाणपत्र (ई-सर्टिफिकेट) प्राप्त होणार

प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना अनुक्रमे पंचवीस हजार, पंधरा हजार आणि दहा हजार रुपयांचे बक्षिस आणि प्रमाणपत्र मिळणार

# स्थापना दिनाच्या निमित्ताने भाजपाचे जोरदार शक्तीप्रदर्शन!

## “विकसित भारत अभियान” चे शहरभरात ‘बॅनरबाजी’ : मंडलनिहाय कार्यक्रम, उपक्रम आणि कार्यकर्त्यांशी संवाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

“विकसित भारत अभियान” चा नारा देत देशभरात भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिवस विविध उपक्रम आणि विधायक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपा वज्रमूठ दाखवली आणि शहरभरात जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात आले. संपूर्ण शहरात पक्षाचे फ्लेक्स लावण्यात आले असून, शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले आहे.

भाजपासह तमाम हिंदू बांधवांचे आराध्य प्रभू श्रीराम जन्मोत्सव अर्थात राम नवमी आणि भाजपा स्थापना दिवस एकत्र येण्याचा योग आला. त्यामुळे एका बाजुला श्रीराम यांचा जयघोष आणि दुसऱ्या बाजुला “अजेय भारत... अजेय भाजपा..” असा संकल्प शहरातील भाजपा कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांचा दिसला आहे.

भाजपाच्या मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय येथे स्थापना दिनाच्या निमित्ताने ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष व आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, आमदार उमाताई खापरे, प्रदेश कार्यकारणी सदस्य सदाशिव खाडे, माऊली थोरात, कार्यकारी अध्यक्ष शत्रुघ्न काटे, जिल्हा सरचिटणीस संजय मंगोडेकर, युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष तुषार हिंगे आदी पदाधिकारी - कार्यकर्ते उपस्थित होते.



आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेत शहरात फ्लेक्सद्वारे विकसित भारत आणि महाराष्ट्रात दीड कोटी सदस्य नोंदणी झाल्याबाबत जनजागृती केली. या जाहिरातींमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे फोटो झळकले आहेत. तसेच, विविध वृत्तपत्र आणि प्रसारमाध्यमांमध्ये पक्षाच्या जाहिरातीही प्रसिद्ध झाल्या आहेत. आमदार लांडगे यांच्या निवासस्थानी त्यांनी सकाळी ध्वजारोहण केले. त्यानंतर भोसरी येथील मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयावर ध्वज फडकावण्यात आला. आगामी निवडणुकांच्या निमित्ताने भाजपाच्या स्थानिक नेत्यांनी एकजुट केल्याचे पहायला मिळत आहे.

### पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपा मजबूत...

**» पिंपरी-चिंचवडमध्ये भारतीय जनता पार्टीची वाटचाल 2014 पासून सक्षम होवू लागली. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी भाजपात प्रवेश केला आणि त्यावेळीचा सत्ताधारी पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसमधील मोठा गट भाजपासोबत गेला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये आमदार महेश लांडगे यांनी भाजपात जाहीर प्रवेश केला आणि मोठा गट भाजपात दाखल झाला. परिणामी, 2017 मध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेवर “कमळ” फुलले. भाजपाच्या सत्ताकाळात शहरातील अनेक मान्यवरांना मोठी संधी मिळाली. त्यामध्ये सदाशीव खाडे, ॲड. सचिन पटवर्धन, अमित गोरखे, उमा खापरे, अनुप मोरे अशा अनेक नेत्यांचा समावेश आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपा बलाढ्य असून, त्या ताकदीने पक्ष संघटना मजबूत होत आहे.**

# मंगेशकर रुग्णालयातील डॉ. घैसास यांचा राजीनामा

## रुग्णालय प्रशासनाची बदनामी : आरोग्य समितीच्या चौकशी अहवालानंतर मोठा निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहायक सुशांत भिसे यांच्या पत्नी तनिशा भिसे यांची दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रशासनाने उपचारांआधीच अनामत रक्कम भरण्यासाठी अडवणूक अडवणूक केल्यामुळे गर्भवती तनिशा यांचा मृत्यू झाला असल्याचा आरोप भिसे कुटुंबियांकडून करण्यात आला होता. ही घटना समोर आल्यानंतर राज्यभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. त्यानंतर राज्य सरकारने या प्रकरणाचा तपास करण्यासाठी चौकशी समिती देखील नेमली. आज (७ एप्रिल) या चौकशी समितीचा अहवाल समोर आला असून यामध्ये भिसे यांच्या मृत्यू प्रकरणात रुग्णालय प्रशासन दोषी असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.




दरम्यान, भिसे कुटुंबाने आरोप केला होता की दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील डॉक्टर सुश्रुत घैसास यांनी उपचारांआधी १० लाख रुपये इतकी अनामत रक्कम भरण्यासाठी अडवणूक केली होती. त्यामुळे डॉ. घैसास यांच्यावर टीका होत आहे. यामुळे डॉ. घैसास चौकशीच्या फेऱ्यात अडकले होते. या चौकशीला कंटाळून घैसास यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिल्याचं वृत्त समोर आलं आहे. आमदार अमित गोरखे यांच्यासह अनेकांनी यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत.

रुग्णालय प्रशासनाची बदनामी, रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची गैरसोय आणि चौकशीला कंटाळून डॉ. घैसास यांनी राजीनामा दिल्याचं सांगितलं जात आहे. त्यांनी आपला राजीनामा रुग्णालयाचे प्रमुख डॉ. धनंजय केळकर यांच्याकडे सुपूर्द केला आहे. केळकर हे काही वेळात पत्रकार परिषद घेऊन घडलेली घटना व घैसास यांच्या राजीनाम्याबद्दल बोलतील.

### आमदार अमित गोरखे काय म्हणाले?

अमित गोरखे म्हणाले, "भिसे कुटुंबाचं सुरुवातीपासून म्हणणं होतं की या दुर्दैवी मृत्यूला डॉ. घैसास जबाबदार आहेत. दीनानाथ मंगेशकर रुग्णालय चांगलं काम करत आहे आणि पुढेही करेल. राज्य सरकारने व मंगेशकर कुटुंबाने ज्या उदात्त हेतूने हे रुग्णालय चालू केलं होतं. त्या हेतूला कुठेतरी काळीमा फासण्याचं काम डॉ. घैसास यांच्या कृतीने केला आहे. त्यामुळे आमची मागणी होती की त्यांच्यावर गुन्हा दाखल करा. आज त्यांनी राजीनामा दिला आहे. याचाच अर्थ तनिषा भिसे यांच्या मृत्यू प्रकरणात कुठेतरी घैसास यांना अपराधीपणा वाटत होता. त्याच अपराधी भावेतून त्यांनी राजीनामा दिला असावा. आपण कुठेतरी चुकलोय ही भावना त्यांच्या मनात आली असेल म्हणून त्यांनी राजीनामा दिला असावा."

### डॉ. घैसास यांनी राजीनामा का दिला?

» डॉ. सुश्रुत घैसास हे या रुग्णालयाचे मानद प्रसुती व स्त्रीरोग तज्ज्ञ आहेत. ते रुग्णालयाचे कर्मचारी नसून ते गेले १० वर्षे कन्सल्टन्ट म्हणून काम करतात. त्यांनी राजीनामा दिला आहे. गेले काही दिवस ते सामाजिक दडपणाखाली वावरत आहेत, धमक्यांचे फोन, समाजमाध्यमांवर होणारी कठोर टीका आणि सामाजिक संघर्षामुळे होणारे वातावरण त्यांच्या सहन करण्याच्या पलीकडे आहे. त्याचा आताच्या रुग्णांच्यावर उपचारांवर परिणाम होईल अशी भीती वाटत आहे. यामुळे त्यांच्या वैद्यकीय विषयावर पुरेशा प्रमाणावर लक्ष केंद्रीत करू शकत नाहीत, रात्रीही झोपू शकत नाहीत. त्यामुळे इतर रुग्णांवर अन्याय होण्यापेक्षा आणि कुटुंबाच्या संरक्षणाकरता त्यांनी दीनानाथ रुग्णालयातील पदाचा राजीनामा दिला आहे. ते फक्त इथेच काम करतात", असंही डॉ. केळकर म्हणाले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पश्चिम महाराष्ट्रातील अतिभव्य शोभायात्रा!

## आमदार महेश लांडगे यांच्या सोबतीने रामभक्तांचा जल्लोष : 'हिंदू एकजूट'चा संकल्प करीत युवकांचा लक्षणीय पुढाकार

**पिंपरी | प्रतिनिधी**

"एकही नारा...एकही नाम... जय श्रीराम..." असा जयघोष करीत पिंपरी-चिंचवडमध्ये राम नवमी उत्साहात साजरी करण्यात आली. पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठी शोभायात्रा भोसरी आणि परिसरातून काढण्यात आली. यामध्ये विविध मंडळांनी एकजुट दाखवत जन्मोत्सव दणक्यात साजरा केला.

इंद्रायणीनगर येथे विश्व हिंदू परिषद, बजरंग दल अशा संघटनांनी भव्य शोभायात्रा काढली. भोसरीतील कृपासाई फाउंडेशनचे संस्थापक प्रदीप पवार यांच्या पुढाकाराने रामरथ सोहळा आयोजित करण्यात आला. यामध्ये महबली हनुमान मूर्ती शोभायात्रेचे आकर्षण ठरले.



तसेच, सुमीत लांडगे युथ फाउंडेशन, जय भवानी युवा मंच, श्री. दुर्गामाता सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ, मोशी येथील शिवयोद्धा ग्रुप, एसवाय ग्रुप सोशल फाउंडेशन, राम नवमी उत्सव समिती, निगडी यांच्या तर्फे प्रभू श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. या सर्व मंडळांचे आधारस्तंभ म्हणून आमदार महेश लांडगे यांच्या नावाचा उल्लेख केला जात आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामांच्या आदर्शमय जीवनातून प्रेरणा घेऊन समाजात सौहार्द, सहिष्णुता आणि सत्याची मूल्ये अधिक बळकट झाली पाहिजेत. श्रीरामांनी दाखवलेली प्रजाहितदक्षता, सत्यनिष्ठा आणि निःस्वार्थ सेवा ही आजही आपल्यासाठी प्रेरणादायी ठरतात. त्यांच्या जीवनातून आपण एकता, शांती आणि समरसतेची शिकवण घेणे आवश्यक आहे.

> 'हिंदू' म्हणून युवकांनी एकोप्याने राहिले पाहिजे. समाजातील आठरापगड जाती-बारा बलुतेदार यांना सोबत घेवून जाणारे हिंदूत्व आपल्या प्रभू श्रीरामांनी शिकवले. त्यांच्या विचारांनीच छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज निर्माण केले. छोट्या-छोट्या मंडळांमध्ये श्रीराम जन्मोत्सव न करता भव्य-दिव्यपणे प्रत्येक परिसरात व्हावा. तमाम हिंदूत्ववादी युवकांनी यावर्षी उत्सव दिमाखात साजरा केला, ही परंपरा कायम रहावी, अशीच प्रार्थना आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.**

# नागरिकांनो...पाण्याचा वापर काटकसरीने करा!

**सुमारे शंभर दिवस पुरेल एवढा पाणीसाठा पवना, वडिवळे आणि आंद्रा धरणात असून या पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

यावर्षी कडक उन्हाळा असूनही सुमारे शंभर दिवस पुरेल एवढा पाणीसाठा मावळ तालुक्यातील पवना, वडिवळे आणि आंद्रा धरणात असून या पाण्याचा वापर काटकसरीने आणि काळजीपूर्वक करावा, असे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

सर्वनागरिकांना आवाहन करण्यात येते की, नागरिकांनी पिण्याचे पाणी हे घरगुती वापरासाठी योग्यरीत्या व काटकसरीने वापरावे. पाणी हे शिळे होत नसल्याने शिल्लक असलेले पाणी फेकून देऊ नये, त्याचा वापर करावा पाणी हे जीवन आहे. पाण्याचा वापर काटकसरीने करावा. ते जपून वापरावे म्हणजे पाण्याची बचत होईल व यामुळे यावर्षी येणाऱ्या पावसाळ्यापर्यंत म्हणजे पाणी सर्वांना पुरेसे उपलब्ध होऊ शकेल व पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही व यंदाचा उन्हाळा सर्वांना सुसह्य जाईल.



मावळ तालुक्यात पवना, वडिवळे आणि आंद्रा ही महत्त्वाची शासकीय धरणे असून या धरणांमधून मावळ तालुक्यातील बहुतांशी गावांना पाणीपुरवठा होतो. तर पवना धरणातून तळेगाव दाभाडे नगरपरिषद, देहूरोड कॅन्टोन्मेंटबोर्ड आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नागरिकांसाठी पाणी उपलब्ध होते. याशिवाय पवना खोऱ्यातील काही गावे व शेतीसाठी या धरणातील पाणी वापरले जाते.

गतवर्षी झालेल्या पावसाळ्यामध्ये तीनही धरणे शंभर टक्के भरली होती. त्यातील पवना धरणामध्ये सध्या ४४.९२ टक्के पाणीसाठा शिल्लक असून तो १०८.२१ दशलक्ष घनमीटर इतका सध्या असल्याचे सहायक अभियंता सचिन गाडे यांनी सांगितले. तर हा पाणीसाठा दि १५ जुलै २०२५ पर्यंत पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे.

मावळ तालुक्यातील वडिवळे धरणात ६२.२ टक्के इतका पाणीसाठा आजमितीला असून तो २९.३३ दशलक्ष घनमीटर असल्याचे वडिवळे पाटबंधारे खात्याचे शाखा अभियंता संतोष शिंदे यांनी सांगितले. हाही पाणीसाठा ह्या खोऱ्यातील लाभार्थ्यांना दिनांक १५ जुलै २०२५ पर्यंत पुरेल, असा अंदाज आहे. या खोऱ्यात कामशेत, कान्हे, टाकवे, पारवडी, वडगाव, जांभूळ, तळेगाव, सांगवी, वारंगवाडी, कातवी, आंबी, नाणोली, वराळे, इंदोरी तसेच देहू, आळंदी ते मरकळ पर्यंत शेती व पिण्याच्यासाठी या पाण्याचा उपयोग होतो, असे शिंदे यांनी सांगितले.

मावळ तालुक्यातील आंद्रा हे तिसरे महत्त्वाचे शासकीय धरण असून या धरणात सध्या ४७.५० टक्के पाणीसाठा आहे. तो पाणीसाठा ४०.८५ दशलक्ष घनमीटर असल्याचे वडगाव मावळ पाटबंधारे शाखा अभियंता माणिक शिंदे यांनी सांगितले.

### धरणातील पाणीसाठा

| धरणे | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|
| » पवना | ४३ % | ४४.९२ % |
| » वडिवळे | ६० % | ६२.२ % |
| » आंद्रा | ५४.२७ % | ४७.५ % |

> दिवसेंदिवस कडक उन्हाळा वाढत चालला आहे. त्यामुळे बाष्पीभवनही जास्त होत आहे तसेच कडक उन्हामुळे पिण्याच्या पाण्याबरोबर शेतीसाठी पाण्याचा वापर वाढत चालला आहे. नागरिकांनी उपलब्ध आहे ते पाणी जपून वापरण्यासाठी काळजी घ्यावी.
>
> - सचिन गाडे, सहायक अभियंता

> मावळ तालुक्यात पवना, वडिवळे आणि आंद्रा या धरणासह कासारसाई, पाचाणे, आढले, मळवंडी ठुले, जाधववाडी या ठिकाणी देखील छोटी धरणे असून त्यामध्ये देखील जुलै महिन्यापर्यंत पुरेल असे पाणीसाठयाचे नियोजन केले आहे. फक्त लाभार्थी नागरिकांनी आपल्याकडे उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करावा.
>
> - आर. बी. गव्हाणकर, अभियंता श्रेणी १

# हिंजवडीतील वाहतूक कोंडी लवकरच सुटणार, उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांचे नियोजन

**हिंजवडी परिसरात वाहतूक कोंडी होते, ही कोंडी फोडण्यासाठी प्रशासनाने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

दररोज हिंजवडी परिसरात वाहतूक कोंडी होते. ही कोंडी फोडण्यासाठी प्रशासनाने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. वाहतूक कोंडीची ठिकाणे शोधून त्यावर उपाययोजनाही करण्यात येणार आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) आयटी पार्कमधील उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांच्या ६५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे नियोजन केले आहे. या प्रकल्पांसाठी भूसंपादन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर भूसंपादनास वेग येणार आहे. त्यामुळे भविष्यात आयटी पार्कमधील कोंडी सुटण्यास मदत होणार आहे.

हिंजवडी आयटी पार्कची उभारणी करताना तेथील वाहनांचा विचार करून रस्ते तयार केले होते. मात्र सध्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून त्यामुळे वाहतूककोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. आयटी पार्कमध्ये वाहनांची संख्या गेल्या काही वर्षांत प्रचंड प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे सध्याचे रस्ते अपुरे पडू लागले आहेत. त्यातच या रस्त्यांना पर्यायी रस्ते करण्याकडे दुर्लक्ष झाल्याने वाहतूककोंडी ही नित्याचीच बाब आहे. त्यामुळे उड्डाणपुलासह नवीन पर्यायी रस्ते तयार केले जाणार आहेत.



### प्रस्ताव मंजूर झाल्यावर भूसंपादन करणार

» हिंजवडी आयटी पार्कमधील उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांसाठी एमआयडीसीकडून भूसंपादन केले जाणार आहे. याबाबतचा प्रस्ताव अभियांत्रिकी विभागाने पाठविला होता. तो मुख्यालयाला पाठविण्यात आला असून, तो मंजूर झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार भूसंपादन सुरू होणार आहे.

### आयटी पार्कमधील असे असणार नियोजित प्रकल्प

- » लक्ष्मी चौकातील उड्डाणपूल
- » लांबी : ७२० मीटर
- » खर्च : ४० कोटी रुपये

### शिवाजी चौक ते स्मशानभूमी सहापदरी रस्ता

- » लांबी : ९०० मीटर
- » खर्च : २४.७४ कोटी रुपये

### आयटी पार्क टप्पा एक ते टप्पा तीन नवीन रस्ता

- » लांबी : ५ किलोमीटर
- » खर्च : ५८४.१४ कोटी रुपये

# बारामतीत गुंडगिरी खपवून घेणार नाही

## मारहाणीचा व्हिडीओ पाहून अजित पवार संतापले, गुंडगिरी करणा-यांवर प्रसंगी मोकाची कारवाई करू, असा निर्वाणीचा इशारा



### पालकांची नैतिक जबाबदारी

» तुमची मुलं काय करताहेत कुठं चुका करताहेत हे पाहणं पालकांची नैतिक जबाबदारी आहे. ती जबाबादारी पालकांनी पार पाडवी मग मला मुंबईला फोन येतात. दादा चुकलं एकदा पोटात घ्या. आरं पोट फुटायला लागलं आणि काय म्हणतो पोटात घ्या, अशी मुश्किल टिपण्णी देखील अजित पवार यांनी यावेळी बोलताना केली. सांगणाऱ्याला पण लाज, लज्जा काही शरम काही कशी वाटत नाही. एवढं त्याला बेदम मारलं. यामुळे शिक्षा कठोर झाल्याशिवाय लोकांना त्याची किंमत कळत नाही, असे देखील ते म्हणाले.

### चूक करणाऱ्यांची शिफारस करू नका

» चुकीच्या गोष्टी करुन मला मुंबईला फोन करुन चुका पोटात घ्या दादा, असे काही जण सांगतात, सांगणा-याला तरी लाज कशी वाटत नाही, असे संतापून अजित पवार म्हणाले. इतक बेदम मारहाण केल्यावर त्याला कठोर शिक्षा झाल्याशिवाय त्याची किंमत समजत नाही, त्या मुळे अशांची शिफारस करु नका.

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती शहर आणि तालुक्यात कसलीही दादागिरी, गुंडगिरी खपवूनघेणार नाही. शहरात गुंडगिरी करणा-यांवर प्रसंगी मोकाची कारवाई करु, असा निर्वाणीचा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला. बारामती पंचायत समितीत रविवारी झालेल्या कार्यक्रमात बोलताना पवार यांनी हा इशारा दिला.

इतर मुद्यांचा उहापोह करतानाच पवार म्हणाले, दोन दिवसांपूर्वी एका युवकाला चार जणांनी जी बेदम मारहाण केली, त्याची व्हिडीओ क्लिप मी पाहिली. असली गुंडगिरी आणि दादागिरी मी खपवून घेणार नाही.

पोलिसांना सांगून त्याच्यावर योग्य ती कलमे लावण्याच्या सूचना दिल्या आहेत. अतिशय चुकीच्या पध्दतीने ही मारहाण झाली असून त्यांना अधिकाधिक कलमे लावून कायदेशीर कारवाईची सूचना अतिरिक्त पोलीस अधीक्षक गणेश बिरादार व उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांना केली आहे. कोणीही कायदा हातात घेण्याचा प्रयत्न अजिबात करु नका, काहीही घडले तर पोलिसांची मदत घ्या, असा सल्लाही पवार यांनी दिला.

आपली मुले मुली काय करतात कोठे जातात, कोणासोबत वावरतात, त्यांचे काय सुरु आहे हे पाहणे पालकांची जबाबदारी आहे, ती त्यांनी पार पाडावी, असे आवाहन त्यांनी पालकांना केले.

बारामतीमधील एका हॉटेल मॅनेजरला काही जणांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या घटनेची व्हिडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर चांगलची व्हायरल झाली असून, या घटनेची दखल राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी घेतली आहे. एका कार्यक्रमात त्यांनी या घटनेवर भाष्य करत असले प्रकार अजिबात खपवून घेतले जाणार नसल्याचा इशारा दिला आहे.

बारामती येथील एका हॉटेलमध्ये हॉटेल मॅनेजर काउंटवर बसला असताना अचानक तिथे दोन व्यक्ती आल्या आणि त्यांनी त्यास मारहाण करण्यास सुरूवात केली. यानंतर त्या व्यक्तीला मारहाण करणाऱ्यांनी हॉटेलबाहेर ओढत नेले. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली. या घटनेवर अजित पवार यांनी भाष्य केले आहे. फुटबॉल कसा खेळाला जातो तसा ते लाथा बुक्क्या मारत चालले होते. मी पोलिसांना सांगितलं अजित पवाराच्या जवळचा कार्यकर्ता किंवा कोणीही असलं त्याच्या मुलानी जर असलं काही केलं तर त्याचा बंदोबस्त करायचा. मी असलं अजिबात खपवून घेणार नाही. असे त्यांनी सांगितले.

त्याच्यावर अशी काही गुन्हे लागतील की ते सतत अशे गुन्हे करत राहिले तर पुढे मोक्का पण लागेल, असा इशारा अजित पवार यांनी दिला. तर मेहरबानी करा कोणीही कायदा हातात घेऊ नका, कोणी काही चुकीच केलं तर पोलिसांकडून येऊन तक्रार करा असे आवाहन त्यांनी केलं. १४ तारेखेला घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जयंती आहे. संविधानाची ७५ वर्षे पूर्ण झाली आहे, तरी काहीकाही जण स्वतःच्या घरीची मालमत्ता असल्यासारखं एखाद्याला बदडून काढत आहेत. हे होता कामा नये. असे देखील अजित पवार यावेळी बोलताना म्हणाले.

# जलशुद्धीकरण प्रकल्प की कचरा डेपो?... आमदार माऊली कटके यांचा संतप्त सवाल

## शिरूर नगर परिषदेचा जलशुद्धीकरण प्रकल्प जो नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे, सध्या तो प्रचंड दुर्दशेला सामोरे जात आहे



### "हे जलशुद्धीकरण केंद्र की कचरा डेपो?" : आमदार कटके

» पाहणीनंतर आमदार कटके म्हणाले, "इतक्या मोठ्या शहरासाठी लाखो रुपयांचा खर्च करून उभारलेली योजना जर नागरिकांना शुद्ध पाणी देण्यात अपयशी ठरत असेल, तर ती बंद करून दुसरा पर्याय शोधावा लागेल." पाहणीदरम्यान, नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागातील लिपिक भूषण कडेकर यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि सद्यस्थितीची माहिती दिली. आमदार कटके यांनी प्रकल्पाच्या सौंदर्यीकरणासाठी विशेष निधी मिळवण्याचे आश्वासन दिले. परिसराची तातडीने स्वच्छता करून हिरवळ विकसित करणे, जलशुद्धीकरण केंद्रातून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर करून वनराई तयार करणे आणि यासाठी आराखडा सादर करण्याचे निर्देश त्यांनी नगर परिषदेला दिले.

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर नगर परिषदेचा जलशुद्धीकरण प्रकल्प जो नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. सध्या तो प्रचंड दुर्दशेला सामोरा जात आहे. स्वच्छतेचा अभाव, देखरेखीची कमी आणि यंत्रणांची मोडतोड यामुळे संपूर्ण केंद्रच कचऱ्याच्या ढिगाऱ्यात बदलले आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली आबा कटके यांनी अचानक दौरा करून केंद्राची पाहणी केली आणि प्रशासनाच्या हलगर्जी कारभारावर खरमरीत टीका केली.

सिद्धीच्या पहाडाजवळ वसलेले हे जलशुद्धीकरण केंद्र सध्या भंगार आणि कचऱ्याच्या डेपोतच रूपांतरित झाले आहे. बांधकाम साहित्याचा राडारोडा, मोकळ्या क्लोरीनच्या गोण्या, आणि घोडनदीवरून येणाऱ्या पाण्याची दुर्गंधी यामुळे आमदार कटके संतप्त झाले. विशेष म्हणजे, पाहणीवेळी कोणताही जबाबदार अधिकारी केंद्रावर उपस्थित नव्हता. उपस्थित कर्मचाऱ्यांना प्रक्रियेची पुरेशी माहितीही नव्हती.

१९८९ मध्ये उभारले गेलेले हे जलशुद्धीकरण केंद्र सध्या जुने झाल्यामुळे विविध दुरुस्ती कामे सुरू आहेत. मात्र त्यासोबतच नियमित देखभाल आणि स्वच्छतेकडे दुर्लक्ष झाल्याने प्रकल्पाची सद्यस्थिती चिंताजनक आहे. या पाहणी दौऱ्यात श्रीराम सेनेचे संस्थापक अध्यक्ष सुनिल जाधव, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर अध्यक्ष एजाज बागवान, तसेच स्वप्नील रेड्डी, अतुल गव्हाणे, हर्षद ओस्तवाल, वसीम शहा आदी कार्यकर्ते उपस्थित होते.